महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

क्रमांकः उसप्र ११२६/प्र.क्र. ११४/प्रशा-१

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: २३ नोव्हेंबर, २०२६

आदेश

श्री. श्रीकांत चंद्रकांत आंडगे, उप सचिव, कृषि विभाग, यांची, कृषि विभागाच्या अधिपत्याखालील कृत्रिम बुध्दिमत्ता व ॲग्रिटेक नाविन्यता केंद्र या कार्यालयातील "व्यवस्थापकीय संचालक" या पदावर खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रथमत: ३ वर्षांच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

(अ) श्री.आंडगे, उप सचिव ज्या तारखेला प्रतिनियुक्तीच्या पदावर रूजू होतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला ते आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्वीकारतील, त्या तारखेला समाप्त होईल.

(ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन / सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

(क) जर त्यांची सेवा स्वीयेत्तर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही, तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेत्तर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेत्तर नियोक्त्याने शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे; आणि

(ड) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे, अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

२. म.ना.से. (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा....इ.) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट-२) मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती विचारात घेऊन,श्री. आंडगे, उप सचिव,यांच्या प्रतिनियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती, कृषि विभागाने ठरवाव्यात.

३. श्री.आंडगे, उप सचिव, यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी कृषि विभागामार्फत हाताळण्यात येतील.

४. श्री.आंडगे, उप सचिव, यांना प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी मंत्रालयीन प्रशासकीय विभागात परत यायचे असल्यास त्यांनी तीन महिन्यांची नोटीस देऊन नियोक्त्यास व सामान्य प्रशासन विभागास कळवावे. तसेच त्यांनी प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी /संपल्यानंतर संवर्ग नियंत्रक विभाग म्हणून सामान्य प्रशासन विभागात रुजू होणे आवश्यक आहे.

५ श्री.आंडगे, उप सचिव, यांना, कृषि विभागाच्या अधिपत्याखालील कृत्रिम बुध्दिमत्ता व ॲग्रिटेक नाविन्यता केंद्र या कार्यालयातील "व्यवस्थापकीय संचालक" या पदावर रूजू होण्याकरिता कृषि विभागाने तात्काळ कार्यमुक्त करावे.

६. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक २५/०८/२०२२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सबंधित अधिकाऱ्याने कार्यमुक्त होताना कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६११२३१३२२०५३५०७ हा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASHANT PUNDLIK BADGERI

Digitally signed by PRASHANT PUNDLIK BADGERI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=07AE22A8E7FA4047CE6FF816D85E77EEC14DB9926B325A140ACF9B28BB990786, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=EC955E2D360E1FDDB6ABAC58A907419053BEECEB5DBAC48A78C89C588FF71BEF, cn=PRASHANT PUNDLIK BADGERI
Date: 2026.11.23 13:23:00 +05'30'

(प्र.पुं.बडगेरी)

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स/प्र.स., मंत्रालय, मुंबई.
३. अ.मु.स.(सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अ.मु.स/प्र.स./सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.
   यांना विनंती करण्यात येते की, श्री.आंडगे, उप सचिव, यांच्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती नमूद केलेल्या आदेशाची एक प्रत या विभागाकडे पाठविण्यात यावी.
५. व्यवस्थापकीय संचालक, कृत्रिम बुध्दिमत्ता व ॲग्रिटेक नाविन्यता केंद्र यांचे कार्यालय. (विभागामार्फत)
६. सह/उप सचिव, कार्यासन.का.१३ अे/आस्थापना, कृषि विभाग मंत्रालय, मुंबई.
७. श्री. श्रीकांत चंद्रकांत आंडगे, उप सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई. (विभागामार्फत)
८. निवडनस्ती प्रशा-१.